आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार दिनांक २९ जून २०२५

ठळक बातम्या

- लोक-सहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं पंतप्रधानांच 'मन की बात' मधे प्रतिपादन.
- नागपूरच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठाने जागतिक स्तरावर ओळख निर्माण करावी- सरन्यायाधीश भूषण गवई यांचे आवाहन.
- भ्रष्टाचार, मराठीवर अन्याय, हिंदी सक्ती, शक्तिपीठ महामार्ग इत्यादी मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा विरोधकांचा आरोप/ अधिवेशन पूर्व चहापान कार्यक्रमावर बहिष्काराचा निर्णय.
- समाजातील आर्थिक, सामाजिक विषमता दूर करून जातीनं नव्हे तर गुणांनी मोठा असलेला समाज निर्माण व्हावा- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेत प्रतिपादन.

**मन की बात**

लोक-सहभागाच्या ताकदीच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवर, मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे तेविसाव्या भागात आज ते बोलत होते. आणीबाणी लादण्याच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्या निमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला त्याबद्दल ते बोलत होते. यासंदर्भात मोरारजी देसाई आणि अटलबिहारी वाजपेयी या माजी पंतप्रधानांनी आणीबाणीच्या निषेधात केलेल्या भाषणांचा अंश ही त्यांनी श्रोत्यांना ऐकवला. आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त यावर्षी विशाखापट्टणम इथं झालेल्या मुख्य कार्यक्रमासह, देश आणि परदेशात विविध ठिकाणी झालेल्या अभिनव उपक्रमांचा तसंच त्यातल्या अभूतपूर्व लोक सहभागाचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाविषयी बोलताना त्यांनी देशभरात केल्या जात असलेल्या अनुकरणीय प्रयत्नांचा उल्लेख केला. पुण्याचे रमेश खरमाळे, वन संवर्धनासाठी करत असलेल्या कार्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या, पाटोदा ग्रामपंचायतीनं सामूहिक प्रयत्नातून कार्बन तटस्थता गाठल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली.

लहान सहान सवयींमधून जेव्हा सामूहिक निर्धार उभा राहतो तेव्हा निश्चितपणे फार मोठं परिवर्तन घडून येतं असं ते म्हणाले.

*महाराष्ट्र के एक गाँव ने भी बड़ी शानदार मिसाल पेश की है / छत्रपति संभाजी नगर ज़िले की ग्राम पंचायत है 'पाटोदा' / ये **Carbon Neutral** गाँव पंचायत है / इस गाँव में कोई अपने घर के बाहर कचरा नहीं फेंकता / हर घर से कचरा इकट्ठा करने की पूरी व्यवस्था है / यहाँ गंदे पानी का **Treatment** भी होता है / बिना साफ किए कोई पानी नदी में नहीं जाता / यहाँ उपलों से अंतिम संस्कार होता है और उस राख से दिवंगत के नाम पर पौधा लगाया जाता है / इस गाँव में साफ-सफाई भी देखते ही बनती है / छोटी-छोटी आदतें जब सामूहिक संकल्प बन जाती हैं, तो बड़ा बदलाव तय हो जाता है /*

एक पेड, माँ के नाम या अभियानात सहभागी होण्याचं आणि भावी पिढ्याचं भविष्य सुरक्षित करण्याचं त्यांनी आवाहन श्रोत्यांना केलं. जागतिक आरोग्य संघटनेनं, भारत हा, ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा केली असल्याची माहिती त्यांनी दिली. या आजाराविरुद्ध न थकता लढा देणाऱ्या प्रत्येकाचं हे यश असल्याचं ते म्हणाले. जलजीवन अभियानामुळे नळाद्वारे स्वच्छ पाणी पोहोचत असल्यामुळेही अशा आजारांचा धोका कमी झाला असल्याचं त्यांनी सांगितलं. भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष विविध देशातल्या जनतेच्या दर्शनासाठी पाठवण्यात आले असून, त्याकरता व्हिएतनाम, थायलंड आणि मंगोलिया इथल्या नागरिकांनी आभाराचे संदेश आपल्याला पाठवले असल्याचं त्यांनी सांगितलं. सर्वांनी आपापल्या राज्यातल्या बौद्ध स्थळांना भेट द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. दीर्घ काळानंतर सुरू झालेली कैलास मानसरोवर यात्रा, जुलैमध्ये सुरू होणारी अमरनाथ यात्रा, आगामी श्रावण महिना, भगवान जगन्नाथ रथयात्रा याचा त्यांनी भक्तिभावाने उल्लेख केला. या यात्रांमध्ये सहभागी होणारे भाविक म्हणजे एक भारत श्रेष्ठ भारत भावनेचं प्रतिबिंब असल्याचं ते म्हणाले. या यात्रांमध्ये सहभागी होणाऱ्या यात्रेकरूंना त्यांनी शुभेच्छाही दिल्या. येत्या एक जुलैला येणाऱ्या डॉक्टर आणि सनदी लेखापाल दिनानिमित्त यांच्या कार्याचा गौरव होणार असल्याचा उल्लेख करत पंतप्रधानांनी त्यांना शुभेच्छाही दिल्या.

**महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी**

नागपूरच्या नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमध्ये उत्कृष्ट प्रकारचे शैक्षणिक वातावरण सुविधा असून, याच्या साह्याने विद्यार्थ्यांनी, विधी क्षेत्र, लिटिगेशन कार्पोरेट लॉ

यासारख्या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करून या विद्यापीठाला केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशात लौकिक प्राप्त करून द्यावा असं आवाहन, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आज नागपूर मध्ये केले. नागपूरच्या वर्धा रोड इथल्या, वारंगा स्थित, महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं उद्घाटन आणि ग्रंथालयाच्या इमारतीचं भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रामुख्यानं उपस्थित होते. तीन राष्ट्रीय विधी विद्यापीठे असणारे महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य ठरलं असल्या बद्दल विशेष आनंद व्यक्त करत करून मुख्यमंत्री म्हणाले...

*और फिर महाराष्ट्र सरकार ने एक बड़ा ही ऐतिहासिक निर्णय लिया जो देश में शायद किसी और राज्य में हमको देखने को नहीं मिलेगा। तो महाराष्ट्र की सरकार ने तय किया कि महाराष्ट्र में तीन नेशनल लॉ यूनिवर्सिटीज़ बनेगी, एक मुंबई में बनेगी, एक छत्रपति संभाजी नगर में बनेगी और एक नागपुर में बनेगी। और मुझे इस बात की खुशी है कि आदरणीय बोबडे साहब, गवई साहब इन्होंने इसमें बहुत पहल की।*

महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी नागपूरमध्ये, पदवी तसंच पदव्युत्तर विधी अभ्यासक्रम उपलब्ध असून इथं पी.एच.डी. अभ्यासक्रम सुद्धा चालवले जातात. आज उद्घाटन झालेल्या प्रशासकीय इमारतीत, कुलगुरू, कुलसचिव, उप-कुलसचिव, परीक्षा विभाग, प्रॉक्टर, मुख्य वॉर्डन, अंतर्गत गुणवत्ता आणि हमी कक्ष, कायदा संग्रहालय, वित्त अधिकारी, अभियांत्रिकी विभाग, विद्यापीठ प्रेस आणि विद्यापीठाच्या इतर कार्यालयांचे बांधकाम जागतिक दर्जाचे आहे.

**चहापान बहिष्कार**

भ्रष्टाचार, मराठीवर अन्याय, हिंदीची सक्ती, शक्तिपीठ महामार्गाला विरोध इत्यादी मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करून राज्य विधि मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारनं आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याची घोषणा, महाविकास आघाडीनं आज केली. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची बैठक आज मुंबईत झाली, त्यानंतर विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांच्यासह इतर नेत्यांनी पत्रकार

परिषद घेतली. राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली आणि हे सर्व मुद्दे विधिमंडळात उपस्थित करणार असल्याचं नमूद केलं. राज्यातली वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचाराच्या आरोपांवर मुख्यमंत्री का गप्प आहेत, युतीधर्मामुळे त्यांनी मौन बाळगलं आहे का, असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. विजय वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी, बेरोजगारी या मुद्द्यांवरून सरकारला लक्ष्य केलं, तर मतांच्या राजकारणासाठी मराठी माणसाचा, मराठी भाषेचा बळी सरकार देत असल्याची टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. अशा सरकारसोबत चहापानाला जाणं योग्य नाही, त्यामुळे चहापानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय महाविकास आघाडीनं घेतल्याचा पुनरुच्चार या सर्व नेत्यांनी केला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस थोड्याच वेळात अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेला संबोधित करणार आहेत.

**राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद**

कोणतीही व्यक्ती जात-पात, धर्माने मोठी नसते, तर तिच्या गुणांनी मोठी होत असते. आपल्याला समाजातील आर्थिक, सामाजिक विषमता दूर करून जातीने नव्हे तर गुणांनी मोठा असलेला समाज निर्माण करायचा आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. राजर्षी शाहू महाराज जयंती आणि सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने, विवेक विचार मंच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि सहयोगी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद आयोजित करण्यात आली. त्यावेळी गडकरी बोलत होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी उपेक्षित समाजासाठी जीवन समर्पित केले असं गडकरी म्हणाले

*या सगळ्या प्रश्नाकडे बघितल्यानंतर बाबासाहेबांनी हे स्वप्न उराशी बाळगलं की आपल्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे आणि हा समाज सर्व या रूढी, प्रथा परंपरापासून मुक्त होऊन प्रगतिशील, समृद्ध, संपन्न, सुशिक्षित, सुसंस्कृत आणि आर्थिकदृष्ट्या देखील ताकदवान बनला पाहिजे. त्यांनी शिक्षणाबद्दल सांगितलं की शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. पहिली गोष्ट आपली मुलंबाळ शिकवली पाहिजे. त्यांना उत्तम शिक्षण दिलं पाहिजे आणि उत्तम शिक्षण दिल्यानंतर त्यांना शिक्षणाच्या आधारावर नॉलेजची शक्ती प्राप्त होईलच.*

उत्तर नागपूरच्या इंदोरा इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कन्वेन्शन सेंटर इथं आयोजित कार्यक्रमाला, पद्मश्री डॉ.नामदेवराव कांबळे, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष, ॲड.धर्मपाल मेश्राम उपस्थिती होते.

**हवामान**

हवामान! पुढील काही तासात विदर्भातील अकोला, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता असून, गडगडाटी वादळ आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा तसंच, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम सरींची शक्यता आहे. प्रादेशिक वामान विभागानं आगामी तीन दिवसांकरिता संपूर्ण विदर्भात सतर्कतेचा येलो अलर्ट जारी केला आहे. दरम्यान, आज नागपूर शहरात सकाळपासूनच पावसाची रिपरिप चालू आहे.

*****